# औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

## दि. २९/११/२००१ रोजी दुपारी ३.०० वा. औरंगाबाद मंडळाच्या ११५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

सदर बैठकीस मंडळाचे खालील पदाधिकारी उपस्थित होते.

१. मा.श्री. रामराव शिनगारे. — उप सभापती/औरंगाबाद मंडळ.
मुख्य अधिकारी तथा उपसभापती,
औरंगाबाद मंडळ.

२. मा. ॲड. श्री जे.पी. पाटील. — सदस्य/औरंगाबाद मंडळ

३. मा.श्री. बबनराव देशमुख. — सदस्य/औरंगाबाद मंडळ

४. मा. श्री. विश्वास उपासे — सदस्य/औरंगाबाद मंडळ

५. श्री. सोनी, शहर अभियंता, — सदस्य (प्रतिनिधी)
(मा.आयुक्त म.न.पा. यांचे प्रतिनीधी)

६. श्री. मो. मुदस्सीर — सदस्य (प्रतिनिधी)
नगर नचनाकार (मा.उपसंचालक,)
नगर रचना यांचे प्रतिनिधी)

मंडळाचे सभापती मा.आ. श्री. कुंडलीकराव नागरे, हे काही अपरिहार्य कारणास्तव बैठकीस येवू शकत नसल्याने व मंडळाची सभा,उपसभापती तथा मुख्य अधिकारी / औरंगाबाद मंडळ यांचे अध्यक्षतेखाली घेणे बाबत दूरध्वनीवरून कळविल्याचे मा. मुख्य अधिकारी / औरंगाबाद मंडळ, यांनी बैठकीत सांगितले व म्हाड कायदा १९७६ मधील कलम २५, २६ व २७ नुसार असलेल्या तरतुदीनुसार मु. अ. तथा उपसभापती यांचे अध्यक्षतेखाली बैठकीचे कामकाजास सुरूवात झाली.

मंडळाच्या ११५ व्या बैठकीस उपस्थित असलेल्या पदाधिकाऱ्यांचे उपसभापती तथा मुख्य अधिकारी / औरंगाबाद मंडळ यांनी स्वागत केले.

## विषय क्र. १ : दि. १८/९/२००१ रोजी झालेल्या ११४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

मंडळाच्या ११४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत सहाय्यक अभियंता श्री. ए.एस. कुलकर्णी, यांनी मंडळास वाचुन दाखविला, मंडळाच्या ११४ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर मंडळाने सविस्तर चर्चा केली. बैठकीत मुख्य अधिकारी / औरंगाबाद मंडळ, यांनी मंडळास माहिती दिली की, मुकुंदवाडी (औरंगाबाद) येथिल व्यापारी मुखंडावर मंडळानेच नियोजन करून योजना राबावावी असे मा. मुख्य अभियंता / प्राधिकरण मुबंई

यांनी पत्र क्र. १९२५ दि. ३१-१०-२००१ अन्वये कळविलेले आहे. त्यामुळे आता मुकुंदवाडी येथील स. क्र. ७/१ व ७/२ वरिल व्यापारी भूखंडावर बांधावयाच्या इमारतीचे / योजनेचे डिझाईन मंडळाच्या नियोजन शाखेकडून / सहाय्यक वास्तुतज्ञाकडून तयार करण्यांत येत आहेत व मंडळाच्या मागील बैठकीतील ठराव क्र. ६८७ नुसार स्पर्धात्मक डिझाईन मागविण्यांत येणार नाही व प्राधिकरणाच्या वरिल पत्राच्या अनुषंगाने, गृहनिर्माण भवनाजवळील भूखंड व मुकुंदवाडी येथिल भूखंड अशा दोन्हीही भूखंडावर मंडळाने नियोजन करून योजना राबवावी असे बैठकीत एकमताने ठरले व वरिल प्रमाणे चर्चा झाल्यानंतर मंडळाने १८/९/२००१ रोजी झालेल्या ११४ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांवर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

## ठराव क्रमांक ६९४ :

मंडळाच्या दि. १८/९/२००१ रोजी झालेल्या ११४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वरील चर्चे नुसार कायम करण्यांत आला.

## विषय क्र. २) :- मौजे बोरी, ता. जिंतूर, जि. परभणी येथिल गट क्र. १६३ मधुन २.० हेक्टर जमिन म्हाड अधिनियम १९७६ चे कलम-५२ अन्वये संपादीत करणे बाबत....

सदर विषयाची बाब टिप्पणी श्री. ए. एस. कुलकर्णी, सहाय्यक अभियंता यांनी मंडळास वाचुन दाखविले. मुख्य अधिकारी/ औरंगाबाद मंडळ यांनी मंडळास माहिती दिली की, मौ. बोरी येथे आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी योजना राबविण्यासाठी सदर ठिकाणी ठोस मागणी अंदाज आजमाविण्यात आली व एकुण १४५ अर्जदारांनी घराच्या किंमतीच्या १०% अनामत रक्कमेसह मागणी नोंदविली. योजनेसाठी ठोस मागणी विचारात घेवून म्हाड कायद्याचे कलम - ५२ अन्वये मौ. बोरी येथिल गट नं. १६३ मधून २.०० हेक्टर खाजगी जमिन घेण्याचा प्रस्ताव प्राधिकरणाला पाठविला व सदर जमिन संपादनासाठी प्राधिकरणाने मान्यता दिल्यानुसार, जमिनीचे मुल्य ठरविण्यासाठी प्राधिकरण / शासनाचे आदेश क्र. एडी एल १०९२/२३४८/ गृ.नि. भू दि. १६/११/१९९८ प्रमाणे गठीत झालेल्या जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकी समोर प्रस्ताव ठेवण्यांत आला. जिल्हास्तरीय समितीने घेतलेल्या बैठकीत जमिनिची किंमत प्रति एकर रु १,३०,५००/- एवढी ठरविली अशी माहिती, मुख्य अधिकारी /औरंगाबाद मंडळ, यांनी बैठकीत दिली. यावर मंडळाचे सर्व सदस्यांनी मत व्यक्त केले की, जिल्हास्तरीय समितीने ठरवीलेली जमिनीची किंमत रू १,३०,५००/- प्रति एकर वाजवी आहे व त्याप्रमाणे २.०० हेक्टर जमिनीचा मोबदला देवून जमिन मंडळाने घेण्यास मंडळाच्या सर्व उपस्थित सदस्यांनी मंजूरी दिली व त्याप्रमाणे वरील दराने जमिन घेण्यासाठी प्रस्तुत प्रकरण मंडळाच्या ठरावासह व शिफारशीसह प्राधिकरणास मान्यतेसाठी प्रस्ताव तात्काळ पाठवावा असा निर्णय मंडळाने एकमतने घेतला.

## ठराव क्रमांक ६९५ :-

मौजे बोरी ( ता. जिंतुर, जि. परभणी ) येथे आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी जिल्हास्तरीय समितीने ठरविलेली क़िंमत रू १,३०,५००/- प्रति एकर या दराने २.०० हेक्टर

जमिन घेण्यासाठी मंजूरी देण्यांत येत आहे. व त्याप्रमाणे जमिनीचा मोवदला देण्यासाठी व जमिन घेण्यासाठीचा प्रस्ताव ( मंडळाच्या ठरावासह व शिफारशीसह ) प्राधिकरणास मंजूरीसाठी तात्काळ पाठवावा असा मंडळाने निर्णय घेतला. तसेच सदर ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पहाता पुढील कारवाई तात्काळ करण्यांत यावी असे ठरले.

**विषय क्रं. ( ३ ) :- सर्वे क्रं. ४३० ( भाग ), ४३१ ( भाग ) रेल्वे स्टेशन रोड, जालना येथिल सुविधा भुखंडाच्या वितरणा बाबत.**

सदर विषयाची बाब टिप्पणी श्री. एस.ए. मियॉन, मिळकत व्यवस्थापक यांनी मंडळास वाचुन दाखविली. श्री मियॉन, मिळकत व्यवस्थापक यांनी माहीती दिली की, जालना यथिल १ ( एक ) भुखंडासाठी मंडळाच्या अपेक्षित दरापेक्षा जास्त दराच्या दोन निविदा प्राप्त झाल्या व या दोन पैकी श्री. पी. पी. देसरडा. यांच्या निविदेतील दर हा इतर निविदेधारकापेक्षा जास्त आहे तसेच श्री. देसरडा यांची निविदा सर्वात जास्त असल्यामुळे त्यावर निर्णयास्तव बाबटिप्पणी मंडळा समोर सादर केली आहे. याविषयी मंडळाचे सदस्य मा. श्री. बबनराव देशमुख, यांनी प्रतिपादन केले की, जालना येथील मोकळया भुखंडाच्या किंमती सद्य:स्थितीत भरमसाठ वाढल्या आहेत. त्यामुळे मंडळाच्या भुखंडासाठी टेंडरद्वारे मागविलेले दर कमी वाटतात व यापेक्षाही जादा दराने भुखंड विक्री होतील असा मनोदय त्यांनी व्यक्त केला. म्हणून जालना येथे भूखंड विक्रीचे बाजारात प्रचलित दर काय आहेत व भुखंड खरेदी-विक्रीच्या व्यवहारात रजिस्ट्री कार्यालयात जालना शहरातील भूखंडाचे काय भाव ठरविले आहेत याची माहिती संकलीत करून सदर विषय मंडळाच्या आगामी बैठकीत विचारार्थ संपुर्ण माहितीसह सादर करावी असा निर्णय मंडळाने एकमताने घेतला व याविषयी वरिल प्रमाणे माहिती गोळा करून मंडळाच्या आगमी बैठकीत या विषयाची बाब टिपणी पुन्हा सादर करावी अशा सूचना. मुख्य अधिकारी / औरंगाबाद मंडळ यांनी मिळकत व्यवस्थापक यांना दिल्या.

**विषय क्रमांक : (४) : मंडळाचे मा. सभापती यांच्या परवानगीने आयत्या वेळी येणार विषय.**

**आयत्या वेळचे विषय क्र. (१) :** राष्ट्रीय गृहनिर्माण कार्यक्रमातर्गत स.न. ५४, भोकरदन, जि. जालना येथे अर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी १२० गाळे व अल्प उत्पन्न गट १४९ गाळे बांधणे, योजनेचे बांधकाम सुशिक्षीत बेरोजगार अभियंता कंत्राटदाराकडुन करून घेणेबाबत.

राष्ट्रीय गृहनिर्माण कार्यक्रमातर्गत स.न.५४ भोकरदन (जि. जालना) येथे प्रस्तावीत गृहनिर्माण योजनेसंबंधी मुख्य अधिकारी / औरंगाबाद मंडळ, यांनी मंडळास माहिती दिली व असे सांगीतले की, मंडळातर्फे राबविण्यांत आलेल्या याजेनांपैकी लातुर येथिल गुमास्ता सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभासदाकरिता बांधलेल्या योजनेचे काम सुशिक्षीत बेरोजगार अभियंत्याकडून करून घेतले आहे. सदर योजनेतील गाळ्यांचे बांधकाम गुणवत्तापूर्ण व विहीत कालावधीत पुर्ण झाले आहे. सदर योजनेचा अनुभव पाहता नियमित निविदा मागविणे, स्विकृती करणे इत्यादी बाबतीत बराचसा कालापव्य होतो, पर्यायाने गाळ्यांच्या किंमतीत वाढ होते तसेच वर्ष २००१-०२ च्या बांधकाम कार्यक्रमात या कामाचा समावेश असल्याने मार्च २००२ पर्यंत काम पूर्ण करणे गरजेचे आहे. म्हणून भोकरदन (जि. जालना) व मौ. बोरी (ता. जिंतूर) येथिल योजनेतील बांधकामे सुशिक्षीत बेरोजगार अभियंता कंत्राटदाराकडुन करण्याच्या

संदर्भात मंडळाचे सभापती मा. आ. श्री नागरे साहेब, यांनीं लेखी पत्राद्वारे सुचनां केली असल्याचे मा. मुख्य अधिकारी / औरंगाबाद मंडळ यांनी मंडळाच्या बैठकीत सांगीतले.

उपरोक्त पार्श्वभूमिवर भोकरदन ( जि. जालना ) व बोरी ( ता. जिंतुर ) येथिल गृहनिर्माण योजना मधील गांळयांचे बांधकाम सुशिक्षीत बेरोजगार अभियंता कंत्राटदाराकडुन करून घेण्याचा प्रस्ताव आहे.

यावर मंडळाने चर्चा करून निर्णय घेतला की,

## <u>ठराव क्र. : ६९६</u>

राष्ट्रीय गृहनिर्माण कार्यक्रमाअंतर्गत हाती घेण्यांत यावयाच्या भोकरदन ( जि. जालना ), मौ. बोरी ( ता. जिंतुर ) येथिल गृहनिर्माण योजनामधील गाळयांचे बांधकाम सुशिक्षीत बेरोजगार कंत्राटदाराकडुन करून घेण्यात यावे.

<u>**आयत्या वेळेचे विषय क्र. २** : राष्ट्रीय गृहनिर्माण कार्यक्रमातर्गत श्री. तुळजा भवानी साखर कारखाना विकास सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभासदाकरिता अल्प उत्पन्न गटातील ८० गाळयांची विशेष गृहनिर्माण योजना राबविणेबाबत.</u>

मंडळाचे मा. सदस्य श्री. उपासे, यांनी सदर विषय बैठकीत आयत्यावेळीचा विषय म्हणुन घेण्यास सांगीतले. त्यानुसार मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ,, यांनी या विषयाची मंडळास सविस्तर माहिती दिली की, अध्यक्ष, श्री. तुळजाभवानी साखर कामगार विकास सहकारी गृहनिर्माण संस्था, नळदुर्ग यांनी त्यांचे संस्थेसाठी अल्प उत्पन्न गटातील ८० घरकुले बांधुन देण्याची विनंती केली आहे. सदर योजनेसाठी लागणारी जमिन संस्थेने खरेदी केलेली असुन संस्था सदरची जमिन विनामुल्य म्हाडाकडे हस्तांतरीत करावयास तयार आहे. सदर योजनेस लगणाऱ्या बाहय सुविधा उक्त संस्था स्वखर्चाने करणार आहे. मंडळाने फक्त गाळयांचे बांधकाम कारावयाचे आहे. कर्ज परतफेडी बाबत संस्था कारखान्याची हमी मिळवून देणार आहे, कारण संस्थेचे सभासद हे कारखान्याचे नियमित कर्मचारी आहेत.

मुख्य अधिकारी / औरंगाबाद मंडळ, यांनी मंडळास अशीही माहिती दिली की, राष्ट्रीय गृहनिर्माण कार्यक्रमांअंतर्गत औरंगाबाद मंडळास १५,४८५ गाळे बांधण्यांचे उद्दिष्ट नेमुन दिले आहे. यातील गृहनिर्माण योजना टप्पा क्र. ३ मध्ये विविक्षीत घटकांकरिता हाती घ्यावयाच्या योजनांचा समावेश आहे.या योजनेतील लाभार्थी पुर्वनिश्चीत असल्याने योजना हाती घेण्यापूर्वी त्यास म्हाडाची / शासनाची मंजुरी आवश्यक आहे. करिता प्रस्ताव म्हाडाकडे पाठविण्याचे प्रस्तावीत आहे. तसेच योजनेतील गाळयांचे बांधकाम लवकरात लवकर व चांगल्या दर्जाचे व्हावे —————— म्हणुन सदर योजनेचे काम सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांचेकडुन करून घेण्याचे प्रस्तावीत आहे.

उपरोक्त प्रमाणे चर्चेअंती मंडळाने एकमताने निर्णय घेतला की,

## ठराव क्र. : ६९७ :

राष्ट्रीय गृहनिर्माण कार्यक्रमाअंतर्गत श्री तुळजाभवानी साखर कामगार विकास सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता अल्प उत्पन्न गट ८० गाळयांची योजना हांती घ्यावी व सदर योजनेचे काम सुशिक्षीत बेरोजगार अभियंता कंत्राटदाराकडुन करून घ्यावे असा प्रस्ताव प्राधिकरणास शिफारशीसह पाठविण्यांत यावा. या बाबत ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

## आपल्या वेळचे विषय क्र. ३ : मराठवाडयातील साखर कारखान्याच्या ऊसतोड/अस्थायी कामगारांसाठी आर्थिकदृष्टया दुर्बल घटक योजना राबविणे.

सदर विषयाच्या बाब टिप्पणीविषयी सविस्तर माहिती मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ, यांनी मंडळास दिली. या विषयी सविस्तर माहिती देतांना मुख्य अधिकारी/औमं.,यांनी मंडळास असे सांगीतले की, मराठवाडयातील साखर कारखान्याच्या उसतोड/अस्थायी कामगारांसाठी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी योजना राबविण्यांबाबत मंडळाने ठराव क्रमांक ६८० अन्वये तत्वत: मान्यता दिलेली आहे. याबाबत मा.मुख्य अभियंता-२/प्रा. यांचेशी चर्चा करण्यांत आली. त्या अनुषंगाने मराठवाडयात सध्या ३२ साखर कारखाने कार्यरत असुन कांही कारखान्याचे उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे . यातील जे करखाने आर्थिकदृष्टया सक्षम आहेत व जे कारखाने उक्त गृहनिर्माण योजनेच्या अटी व शर्ती मान्य करतील अशाच सक्षम कारखान्यासाठी सदरील गृहनिर्माण योजना राबवावयाची आहे. योजनेसाठी कारखान्यांनी खालील बाबींची पूर्तता करावयाची आहे.

१. या योजनेतील घरकुला ंची अंदाजीत किंमत रू. ३५०००/- एवढी राहणार असुन यात जमिनीची व बाहयसुविधांपोटी लागणाऱ्या खर्चाचा समावेश नाही.

२. योजनेसाठी लागणारी बोजाविरहीत जमिन कारखान्याने म्हाडास विनामुल्य हस्तांतरीत करावयाची आहे. यामुळे भूसंपादन प्रक्रिया व जमिनीचा मावेजा यामुळे होणारा विलंब टळेल.

३. सदर योजनेस लागणाऱ्या बाहय सुविधा जसे रस्ते, पाणीपुरवठा, विज, मलनि:सारण इत्यादी कारखान्याने विनामुल्य पुरवावयाच्या आहेत.

४. सदर योजनेतील गाळे कारखान्याने ऊसतोड कामगारांनाच वाटप करावयाची आहेत तसेच सदर योजनेतील गाळयांच्या कर्ज परतफेडीची हमी कारखाना घेणार आहे. म्हणजेच कर्ज परतफेडीचा मासिक हप्ता कारखाना म्हाडाकडे भरणार आहे.

५. कारखान्यात काम करणारे ऊसतोड कामगार जरी निश्चीत नसले तरी कारखान्याच्या मागणीनुसार बांधलेली घरे कारखान्याने गृहनिर्माण योजनेच्या अटी व शर्तीची पुर्तता केली असल्यामुळे कर्ज परतफेडीनंतर कारखान्याच्या मालकीची होतील..

६ मंडळाने लातुर येथिल गुमास्ता सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता बांधलेल्या गृहनिर्माण योजनेचे काम सुशिक्षीत बेरोजगार अभियंता कंत्राटदाराकडुन करून घेतले आहे. त्याची गुणवत्ता व दर्जा विचारात

घेवून, तसेच योजनेतील गाळे विहित कालावधीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने उक्त योजनेमधील गाळ्यांचे बांधकाम सुशिक्षीत बेराजगोर कंत्राटदार अभियंताकडुन करून घेण्याचा प्रस्ताव आहे.

उपरोक्त प्रमाणे सविस्तर चर्चा केल्यानंतर मंडळाने एकमताने निर्णय घेतला की,

**<u>ठराव क्र. ६९८ :</u>**

मराठवाड्यातील सहकारी साखर कारखान्याच्या ऊसतोड/अस्थायी कामगारांसाठी राष्ट्रीय गृहनिर्माण कार्यक्रमाअंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठीची गृहनिर्माण योजना हाती घेण्याबाबतचा प्रस्ताव शिफारशीसह प्राधिकरणाकडे पाठवावा. जे कारखाने आर्थिकदृष्टया सक्षम आहेत व मंडळाच्या अटी व शर्तीचीं पुर्तता करतील अशाच कारखान्यासाठी ही योजना राबवावी व या योजनेची कामे सुशिक्षीत बेरोजगार कंत्राटदाराकडून करून घ्यावी अशा आशयाचा प्रस्ताव प्राधिकरणास शिफारशीसह पाठवाव. सदर ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कारवाई करण्यांत यावी.

वरील प्रमाणे पटलावरील विषय संपल्यानंतर मंडळाचे सन्माननीय सदस्य यांनी खालील प्रमाणे बैठकीत मुद्दे उपस्थित केले.

१. मंडळाचे सन्माननीय सदस्य श्री. जे. पो. पाटील यांनी मुद्या उपस्थित केला की, जालना येथिल बिडी कामगारांसाठी बांधलेल्या गाळ्यांचे खिडक्या, चौकटी व पाईप्स इ. गायब झाले व त्यात झालेल्या नुकसानाची चौकशी करणे व यात जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यावर त्या संबंधीची जबाबदारी निश्चित करून झालेल्या नुकसानीची रक्कम संबंधीत अधिकाऱ्याकडून वसुल करावी असे मागील बैठकीत ठरले होते व त्याप्रमाणे मुख्य अधिकारी / औरंगाबाद मंडळ, यांनी कार्यकारी अभियंता यांना चौकशी करून अहवाल सादर करावा म्हणून सूचना दिल्या होत्या. प्रस्तुत प्रकरणात काय कारवाई केली या बाबत मा. श्री. पाटील, सदस्य, यांनी विचारणा केली. याविषयी कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, त्यांनी वरील गाळ्यांची पाहणी करून तसा अहवाल मुख्य अधिकारी यांना सादर केला आहे. बिडी कामगार योजनेतील गाळ्यांचे दरवाजे, खिडक्याच्या जाळ्या. संडासचे भांडे इत्यादी चोरीस गेले आहेत व गाळ्याची बरीच नासधुस झाली आहे असे स्पष्टीकरण कार्यकारी अभियंता श्री. येरावार यांनी बैठकीत केले. मा. श्री. पाटील सदस्य व मा. श्री. देशमुख, सदस्य, यांनी सांगितले की, वरिल प्रमाणे गाळ्यांच्या साहित्याची झालेल्या चोरी प्रकरणी व त्यामुळे झालेल्या नुकसानी बाबत संबंधीत अधिकाऱ्यावर चौकशी करून कारवाई करावी. श्री. येरावार, कार्यकारी अभियंता यांनी बैठकीत नमुद केले की, झालेल्या नुकसानीस जे अधिकारी कर्मचारी जबाबदार आहेत. त्यापैकी काही निवृत्त झाले आहेत व काहींच्या बदल्या मंडळाच्या बाहेर झाल्या आहेत त्यामुळे त्यांचेवर जबाबदारी निश्चित करणे अवघड आहे. याबाबत मंडळाचे सदस्य मा. श्री. पाटील व मा. श्री. देशमुख, यांनी सांगितले की, जे अधिकारी नुकसानीस जबाबदार ठरतील त्यांचे विरूध्दचा अहवाल प्रथम कार्यकारी अभियंता श्री. येरावार यांनी मंडळासमोर ठेवावा व तद्नंतर त्यावर कशा प्रकारे पुढील कारवाई करावी लागेल याबाबत मंडळ विचार करेल व निर्णय होईल. वरिल, प्रमाणे चर्चा झाल्यानंतर मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ, यांनी प्रतिपादन केले की, प्रथम झालेल्या नुकसानीची जबाबदारी, जबाबदार ठरणाऱ्या अधिकारी/ कर्मचाऱ्यावर निश्चित करावी व त्यासाठी वस्तुस्थितीदर्शक अहवाल मंडळासमोर येण्यासाठी मंडळाचे सन्माननीय सदस्य श्री. जे.पो. पाटील, श्री. बबनराव देशमुख, श्री. विश्वास उपासे, श्री. बबनराव राउत व श्री. साहेबराव खरात यांची एक उप समिती नेमून या उप

समितीने झालेल्या नुकसानीचे मुल्यमापन करून व गाळे विक्री बाबत पुढे मंडळाने काय उपाययोजना कराव्यात याबाबत उपाय सुचवावेत म्हणजे त्याप्रमाणे निर्णय घेणे सोपे होईल असे मुख्य अधिकारी यांनी बैठकीत सांगितले. व या उपसमितीने जालना येथिल बिडी कामगारं योजनेतील गाळ्यांची पहाणी करून दोषी व्यक्ती बाबत अहवाल दयावा व घरे कशी वाटप करता येतील याबाबत उपाय सुचवावेत.

मंडळाच्या उप-समितीतील वरिल पांच सदस्यांना जालना येथे जाण्यासाठी सन्माननीय सदस्यांशी समन्वय साधून, त्यांच्या पाहणी दौऱ्याचा कार्यक्रम आखुन व त्यांचे समवेत जालना येथे जाण्यासाठी कार्यकारी अभियंता श्री. येरावार यांनी कार्यवाही करावी व उपसमितीचा अहवाल मंडळाच्या पुढील बैठकीसमोर सविस्तरपणे अहवाल येईल याची काळजी श्री. येरावार यांनी घ्यावी असे बैठकीत एकमताने मंडळाने ठरविले. त्यानुसार मुख्य अधिकारी, यांनी श्री. येरावार यांनां वरिल प्रमाणे कारवाई करण्यासाठी सूचना दिल्या व मंडळाच्या पुढील बैठकीसमोर अहवाल सादर करण्यासाठी मुख्य अधिकारी यांनी श्री., येरावार, यांना सुचना दिल्या.

२. सन्माननीय सदस्य श्री. जे. पी. पाटील यांनी प्रतिपादन केले की, म्हाळजा (नांदेड) येथील मंडळाच्या वसाहतीत अतिक्रमण झाल्याची माहिती त्यांना मिळाली आहे. तसेच या वसाहतीमधील बरेच गाळे विक्री अभावी रिक्त पडलेले आहेत व सदर गाळ्यांची नासधुस होत आहे, करिता म्हाळजा (नांदेड), येथील रिक्त गाळे वाटपासाठी कार्यवाही करावी, तसेच रिक्त गाळ्यांच्या झालेल्या नास-धुसीबाबत व तेथे झालेल्या अव्रिकमणाबाबतची माहिती मंडळा समोर सादर करावी असे मंडळाच्या सर्व सदस्यांनी बैठकीत सांगीतले, मुख्य अधिकारी / औरंगाबाद मंडळ, यांनी कार्यकारी अभियता यांना सूचना दिल्या की, त्यांनी म्हाळजा (नांदेड) येथील मंडळाच्या वसाहतीत जावून रिक्त गाळ्यांची व तसेच अतिक्रमणाविषयी पाहणी करून वस्तुस्थिती दर्शक अहवाल मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करावा. तसेच जे गाळे या वसाहतीत रिक्त आहेत ते वाटपासाठी तात्काळ कार्यवाही मिळकत व्यवस्थापक यांनी सुरू करावी अशाही सूचना मुख्य अधिकारी / औरंगाबाद मंडळ यांनी दिल्या.

३. मंडळाच्या वसाहतीत किंवा मंडळाच्या मोकळ्या जागेवर / जमिनीवर अतिक्रमण होऊ देवू नये याबाबतही मंडळाच्या सर्व संबंधीत अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी असे मंडळाच्या सदस्यांनी बैठकीत सांगितले.

वरील प्रमाणे पटलावरील विषय संपल्यानंतर व वरिल प्रमाणे चर्चा व ठराव संमत झाल्यानंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने उपस्थितांचे आभार मानुन राष्ट्रगिता नंतर बैठक समाप्त झाली.